जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 FEB 2019
तरुण भारत

# मार्च-एप्रिल परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मार्च-एप्रिल २०१९ च्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. परीक्षांना २३ मार्चपासून सुरुवात होणार असून



तिन्ही जिल्ह्यातून सर्वसाधारणं अडीच लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या वेळापत्रकाची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. मार्च-एप्रिल २०१९ च्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या तारखाही विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत. विनाविलंब शुल्कासह ४ ते २० फेब्रुवारीपर्यंत अर्ज भरावयाचे आहेत. विलंब शुल्कासह २१ ते २६ फेब्रुवारी तसेच अतिविलंब शुल्कासह २७ फेब्रुवारी ते ४ मार्चपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचे आहेत. महाविद्यालयांनी अर्जाच्या याद्या २७ फेब्रवारीपासून सादर करावयाच्या आहेत. दूरशिक्षण अभ्यासकेंद्राच्या महाविद्यालयांनी नियमित विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेसह दूरशिक्षण अभ्यासक्रमासह विद्यार्थ्यांची व्यवस्था करावयाची आहे. शासनातर्फे अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची 'एमएचटी-सीईटी' सामाईक प्रवेश परीक्षा २ ते १३ मे कालावधीत होणार आहे. या कालावधीत अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र व आर्किटेक्चरच्या परीक्षा आयोजित होणार नाहीत.

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील उन्हाळी सत्रामधील परीक्षांचे वेळापत्रक शनिवारी संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले. २६ मार्चपासून विविध अभ्यासक्रमांच्या होणाऱ्या परीक्षेस अडीच लाख परीक्षार्थींचा समावेश असणार आहे. उद्या, सोमवारपासून ऑनलाईन अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे.

मार्च-एप्रिल २०१९ मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा व अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर केल्या आहेत. ४ ते २० फेब्रुवारीपर्यंत नियमित अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे. त्यानंतर विलंब शुल्कासहित २१ ते २६ फेब्रुवारीपर्यंत, तर अतिविलंब शुल्कासह २७ फेब्रुवारी ते ४ मार्चपर्यंत अर्ज भरता येणार आहेत.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 03, 2019
Powered by: erelego.com

# सहयोगी प्राध्यापकांना प्रस्तावासाठी आवाहन

**कोल्हापूर :** सहयोगी प्राध्यापकांचे प्रस्ताव ११ फेब्रुवारीपर्यंत पाठवावेत, अशा सूचना शिवाजी विद्यापीठाकडून महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. महाविद्यालयीन शिक्षकांची केंद्रीय पद्धतीने सहाव्या वेतन आयोगानुसार स्थाननिश्चिती करण्यासाठी विद्यापीठातर्फे शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन सहयोगी प्राध्यापक (स्टेज-५) च्या स्थाननिश्चितीबाबत सर्व बाबींची पूर्तता करून माहिती जोडलेल्या प्रपत्रात भरून प्रस्ताव कार्यालयास पाठविण्याची मुदत ३१ जानेवारी होती. तरीही प्राध्यापकांचे प्रस्ताव मुदतीत आले नाहीत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 FEB 2019
तरुण भारत

# सहयोगी प्राध्यापकांनी प्रस्ताव पाठवावे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन प्राध्यापक स्टेज-५ (एजीपी १००००) च्या स्थानिश्चितीबाबत प्रस्ताव सादर करण्यासाठी यापुर्वी ३१ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. तरीही काही प्राध्यापकांचे प्रस्ताव अद्याप आलेले नाहीत. त्यामुळे या प्राध्यापकांचे प्रस्ताव ११ फेब्रुवारीपर्यंत विद्यापीठाकडे सादर करावे, अशा सूचना परिपत्रकाव्दारे महाविद्यालयांना देण्यात आल्या होत्या.